## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

### सर्व साधारण सभा

सोमवार दिनांक २५.११.२०१३ रोजी दुपारी २.३० वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या शंकररावजी चव्हाण सभागृहात भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. सदस्य उपस्थित होते.

**मा. श्री अ.सत्तार अ.गफुर,महापौर**

सर्वश्री /श्रीमती

| | |
|---|---|
| चव्हाण आनंद शंकरराव | कदम गंगाबाई नारायणराव |
| कल्याणकर बालाजीराव दत्तराव | सातेलीकर श्रीनिवास आशन्ना |
| पवळे उमेश देवराव . | कोकाटे नागाबाई भुजंगराव |
| कंठेवाड सविता मारोतराव | बियाणी प्रविण बालाप्रसाद |
| पांढरे स्नेहा सुधाकर | फारुख अली खॉ इलियास खॉ |
| अंजूम बेगम शेख अफरोज | मुंडे शांता मोतीराम |
| कल्याणकर बालाजी देविदासराव | आनेवार गंगासागर संदीप |
| भवरे किशोर दामोधर | कदम शिला सुनिल |
| पांढरे सुधाकर रामराव | कनकदंडे मोहिनी महेशराव |
| वाजेदा तबसुम अथर अली खान | स.जानी म.कासीम. |
| पोकर्णा नवलकुमार ओमप्रकाश | जाधव जयश्री आनंद |
| गुर्रम विनयकुमार जगदिश | चव्हाण श्रध्दा सुशिल |
| गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ | जिंदम पार्वती व्यंकटेश |
| उमरेकर अशोक रावण | मुदीराज कमलाबाई रामस्वामी |
| रजियाबेगम अय्युबखान | सलीमा बेगम नुरुल्लाखान |
| गाडगे शंकर जयवंतराव | देशमूख वैशाली मिलींद |
| गायकवाड अंजली सुरेशराव | देशमूख बाळासाहेब गंगाधरराव |
| सय्यदा इजरत फातेमा मजहर हुसेन | गफारखान गुलाम महमंदखान |
| धबाळे गणपत गुणाजी | अनुजा अमितसिंह तेहरा |
| यादव तुळजाराम गणेशलाल | शर्मा पुषाताई राजेश |
| नवाब गुरुमितसिंघ ब-यामसिंघ | राओत्रे संगिता पृथ्वीराज |
| गिल सरजितसिंघ पंजाबसिंघ | अ.हबीब अ.रहिम बागवान |
| अब्दुल फसीया फिरदोस | स.शेर अली स.महेबूब अली |
| सय्यदा इतरत फातेमा अ.शमीम | कुरेशी चॉदपाशा खाजा |
| तेहसिन बेगम अब्दुल समद | फ़ारुख हुसेन कासिमसाब |
| कोकूलवार लक्ष्मीबाई तुळशीराम | राखेवार सतिष शेषप्पा |
| कुरेशी शफि अहेमद | चाऊस हसीना बेगम साबेर |
| अ.लतिफ अ.मजिद | गुरुखुदे सुंदरलाल किशनलाल |
| खोमणे सुदर्शना महेश | बावजीर शेख हबीब शे. अब्दुल्ला |
| रावत दिपकसिंह काशिनाथसिंह. | अन्नपुर्णाबाई जम्मूसिंह ठाकूर |
| किशोर यादव | सोडी गुरुपिंतकौर दिलीपसिंघ |
| गायकवाड वैजयंती भिमराव | मोरे संजय गंगाधराव |
| अभिषेक सौदे | काकडे सिंधू पांडूरंग |
| देशमूख मंगला गजानन | चिखलीकर संदिप सुभाषकराव |
| सौ.ललिता मुकुंदराव बोकारे | विनय विश्वाभंरराव पाटील |
| जमदाडे करुणा भिमराव | घोगरे इंदूबाई शिवाजी |
| येवनकर विजय हिराचंद | कदम विश्वास बालाजी |
| ॲड.बन श्याम वामनराव | अल केसरी हसन बिन उबेद |
| काबरा रामनारायण रामदेव | |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. महापौर श्री अ.सत्तार अ,गफूर, हे होते. तसेच श्री जी श्रीकांत, आयुक्त, श्री राजेंद्र खंदारे,उपआयुक्त,महसुल,श्री रत्नाकर वाघमारे,उपआयुक्त (पा.पू.व म.नि.वि.), सौ.विद्या गायकवाड ,उपआयुक्त (प्रशासन) , सौ.मिरा कुलकर्णी, मुख्य वैद्याकिय आरोग्याधिकारी, श्री कोळेकर,कार्यकारी अभियंता, सौ.वसुधा फड ,स.आयुक्त एलबीटी, श्री विजय मुंढे,स.आयुक्त आरोगय, श्री भिसे, प्रभारी मुख्य लेखा परिक्षक, श्री जोशी, शिक्षणाधिकारी, श्री गिरीष कदम,अभियंता. नांवामनपा नांदेड व महानगरपालिकेचे सर्व सहायक आयुक्त/क्षेत्रिय अधिकारी व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

**विषय क्र.१**

दिनांक २८.६.२०१३, दि.३१.८.२०१३ रोजी झालेल्या मागील सभेच्या इतिवृत्तास कायम करणे बाबत.

**कार्यकारी अभियंता** दिनांक ३१.८.२०१३ रोजी झालेल्या सभेतील ठराव क्र.११६ मध्ये परिच्छेद क्र.२ मध्ये तसेच सदरील प्रकल्पासाठी लागणारा एकूण खर्च रु.२१.७० कोटी पैकी १) केंद्र शासन वाटा ८० टक्के रु.१५.१९ कोटी २) महाराष्ट्र शासन वाटा रु.३.२५५ कोटी ३) स्थानिक संस्थेचा वाटा रु.३.२५५ कोटी असा खर्च करणे नियोजित आहे.असे आहे परंतु कॅलक्युलेशन करतांना त्यामध्ये चुक झालेली आहे त्यामूळे त्यात तसेच सदरील प्रकल्पासाठी लागणारा एकूण खर्च रु.२१.७० कोटी पैकी १) केंद्र शासन वाटा ८० टक्के रु.१७.३६ कोटी २) महाराष्ट्र शासन वाटा रु.२.१७ कोटी ३) स्थानिक संस्थेचा वाटा रु.२.१७कोटी असा खर्च करणे नियोजित आहे. दुरुस्ती करण्यात यावी

**महापौर** दि.२८.६.२०१३ रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्तास कायम करण्यास मान्यता देण्यात येते तसेच दि.३१.८.२०१३ रोजी झालेल्या सभेतील ठराव क्र.११६ मध्ये का.अभियंता यांनी सुचविल्याप्रमाणे दुरुस्ती करुन सभेच्या इतिवृत्तास कायम करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.१७१** **ठराव**

दिनांक २८.६.२०१३ रोजी झालेच्या सभेच्या इतिवृत्तास कायम करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारणसभा सर्वानुमते मान्यता देते.तसेच दि.३१.८.२०१३ रोजी झालेल्या मागील सभेच्या इतिवृत्तातील ठराव क्र.११६ च्या परिच्छेद क्र.२ मध्ये तसेच सदरील प्रकल्पासाठी लागणारा एकूण खर्च रु.२१.७० कोटी पैकी १) केंद्र शासन वाटा ८० टक्के रु.१५.१९ कोटी २) महाराष्ट्र शासन वाटा रु.३.२५५ कोटी ३) स्थानिक संस्थेचा वाटा रु.३.२५५ कोटी असा खर्च करणे नियोजित आहे.असे आहे परंतु कॅलक्युलेशन करतांना त्यामध्ये चुक झालेली असल्यामूळे त्यात तसेच सदरील प्रकल्पासाठी लागणारा एकूण खर्च रु.२१.७० कोटी पैकी १) केंद्र शासन वाटा ८० टक्के रु.१७.३६ कोटी २) महाराष्ट्र शासन वाटा रु.२.१७ कोटी ३) स्थानिक संस्थेचा वाटा रु.२.१७ कोटी असा खर्च करणे नियोजित आहे.अशी दुरुस्ती करुन दि.३१.८.२०१३ रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्तास कायम करण्यास ही नांवाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**विषय क्र.२**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रातील मुला मुलीचे गुणोत्तर प्रमाणाची खालील प्रमाणे माहिती देण्यात आली त्याची नोंद घेणे बाबत.

**लिंग गुणोत्तर - २०१३**

| अ. क्र. | महिना | एकुण जन्म पुरुष | स्त्री | एकुण | लिंग गुणोत्तर प्रतिहजार मुलींचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १. | सप्टेंबर | ७१६ | ५६४ | १२८० | ७८७.७० |

**महापौर** माहितीची नोंद घेण्यात येते.

**ठराव क्र.१७२** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रातील मुला मुलीचे गुणोत्तर प्रमाणाची खालील प्रमाणे माहिती देण्यात आली त्याची नोंद ही नांवाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.

**लिंग गुणोत्तर - २०१३**

| अ. क्र. | महिना | एकुण जन्म पुरुष | स्त्री | एकुण | लिंग गुणोत्तर प्रतिहजार मुलींचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १. | सप्टेंबर | ७१६ | ५६४ | १२८० | ७८७.७० |

**विषय क्र.३**

मुख्य अधिकारी तथा उपमुख्य अभियंता, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद यांचे पत्र क्र. ८२३६ दि. ३१.१२.१० च्या अनुषंगाने नांदेड शहराच्या वाढीव क्षेत्राच्या विकास योजनेमधील मौ. आसदवन मधील गट क्र. ४७, ४८, ५२, ५४, ५५,

५६, ५७, ५८, ५९, ६०, ६१, ६२, ६३, ६४, ६५, ६७, ६८, ६९, ७०, ७१, ७२, ७३, ७४,११३, ११४, ११५,११६, ११७, ११८, ११९, १२०, १२८, १२९, १३०, १३१ हे सोबतच्या नकाशात दर्शवलेले नूसार रहिवास भागात सामाविष्ट करण्यात येवून या क्षेत्रावर म्हाडाच्या अत्यल्प, मध्यम व उच्च उत्पन्न गटाच्या गृहनिर्माण योजना राबविण्याकरिता ५३.७५ हेक्टर जागा आरक्षित करण्याबाबत विनंती केलेली आहे.

तथापि, सदरील मागणी केलेली जागा ही वाढीव क्षेत्रापैकी असून सदरील भागाची विकास योजना अद्याप तयार झालेली नाही. तसेच उक्त जागेवरील पत्रात नमूद केलेनूसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने उपरोक्त गट क्र. पैकी मौ. आसदवन मधील गट क्र. ६१, ११३, ११६, १२९, ११९, १२०, ११८, ५६ व ५७ मध्ये रहीवास वापराकरीता अभिन्यासास मंजूरी प्रदान केलेली असल्यामूळे सदरचे गट क्र. वगळून उर्वरित मागणी केलेल्या जागेत रहिवास कारणासाठी आरक्षण प्रस्तावित करण्याबाबत निर्णय घेण्याचा प्रस्ताव नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव ठेवण्यात यावा.

**दिपकसिंह रावत** मुख्य अधिकारी तथा उपमुख्य अभियंता, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद यानी दि.३१.१२.२०१० रोजीच्या पत्रकान्वये एकूण ३५ ठिकाणी म्हाडाच्या अत्यल्प, मध्यम व उच्च उत्पन्न गटाच्या गृहनिर्माण योजना राबविण्याकरिता ५३.७५ हेक्टर जागा रहिवाशी वापराकरीता आरक्षित करण्याबाबत महानगरपालिकेस विनंती केली होती .

आयुक्तांनी नगरसचिव विभागास जो प्रस्ताव सादर केला त्यामध्ये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने उपरोक्त गट क्र. पैकी मौ. आसदवन मधील गट क्र. ६१, ११३, ११६, १२९, ११९, १२०, ११८, ५६ व ५७ मध्ये रहीवास वापराकरीता अभिन्यासास मंजूरी प्रदान केलेली असल्यामूळे सदरचे गट क्र. वगळून उर्वरित मागणी केलेल्या जागेत रहिवास कारणासाठी आरक्षण प्रस्तावित करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

तसेच मुख्य अधिकारी तथा उपमुख्य अभियंता, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या पत्रात आसदवन मधील गट क्र.११३ चा भाग असे नमूद आहे पंरतु आयुक्ताच्या प्रस्तावात गट क्र.११३ असा उल्लेख आहे. अर्जदार श्री प्रमोद पाटील व इतर २ व्यक्तीने गट नं.११३ मधील २.१६ हेक्टर असा उल्लेख प्रस्तावात करण्याबाबत विनंती केली आहे. यामध्ये काही चुक झाली असेल तर ती दुरुस्त करण्यात यावी.

मुख्य अधिकारी तथा उपमुख्य अभियंता, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद यांनी म्हाडाच्या अत्यल्प, मध्यम व उच्च उत्पन्न गटाच्या गृहनिर्माण योजना राबविण्याकरिता ५३.७५ हेक्टर जागा रहिवाशी वापराकरीता आरक्षित करण्याची मागणी केली आहे ,आयुक्तांनी शिफारस केल्यानुसार आसदवन मधील गट क्र. ६१, ११३, ११६, १२९, ११९, १२०, ११८, ५६ व ५७ मधील १७.५३ हेक्टर जागा वगळली तर अत्यल्प, मध्यम व उच्च उत्पन्न गटाच्या गृहनिर्माण योजना राबविण्याकरीता फक्त २६.२२ हेक्टर जागा शिल्लक राहत आहे.मागणी ५३.७५ हेक्टरची आहे यामध्ये खुप तफावत आहे.तरी याबाबत म्हाडाशी पत्रव्यवहार करुन दुसरा प्रस्ताव सर्वसाधारण सभे समोर आणावा.

**स.शेर अली** श्री दिपकसिंह रावत यांनी जो मुध्दा उपस्थित केलेला आहे तो बरोबर आहे. मुख्य अधिकारी तथा उपमुख्य अभियंता, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद यांनी दि. ३१.१२.१० च्या अनुषंगाने नांदेड शहराच्या वाढीव क्षेत्राच्या विकास योजनेमधील मौ. आसदवन मधील गट क्रमांकामधील क्षेत्रावर म्हाडाच्या अत्यल्प, मध्यम व उच्च उत्पन्न गटाच्या गृहनिर्माण योजना राबविण्याकरिता ५३.७५ हेक्टर जागा आरक्षित करण्याबाबत दि.३१.१०.२०१० ला विंनती केलेली आहे.त्यांनंतर महानगरपालिकेने मौ. आसदवन मधील गट क्र. ६१, ११३, ११६, १२९, ११९, १२०, ११८, ५६ व ५७ मध्ये रहीवास वापराकरीता अभिन्यासास मंजूरी प्रदान केलेली आहे त्यामूळे अत्यल्प, मध्यम व उच्च उत्पन्न गटाच्या गृहनिर्माण योजना राबविण्याकरिता २६.२२ हेक्टर जागा शिल्लक राहत आहे.करीता मुख्य अधिकारी तथा उपमुख्य अभियंता, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,यांना पुनश्च सुधारीत प्रस्ताव सादर करण्यासाठी कळविण्यात यावे.

**फारुख हुसेन** मुख्य अधिकारी यांनी दि.३१.१२.१० ला ५३.७५ हेक्टर जागा रहिवाशी वापराकरीता आरक्षित करण्याबाबत मागणी केली पत्र येण्यापुर्वी व त्यानंतर महानगरपालिकेने जवळपास १७.५३ हेक्टर जागेचे ले आवूट मंजुर केलेले असल्यामूळे आता शिल्लक जागा २६.२२ हेक्टरच रहात आहे त्यामूळे मुख्य अधिकारी यांचेकडून नविन प्रस्ताव मागविण्यात यावा.

**बावजीर शेख हबीब** मुख्य अधिकारी तथा उपमुख्य अभियंता, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,यांनी काही ठराविक गट नंबरच रहिवास भागात सामाविष्ट करण्याची मागणी केलेली आहे.महानगरपालिकेने

आपल्यास्तरावर ले आवूट मंजुर केलेले त्यामूळे कोणावरही अन्याय होवू नये म्हणून याप्रस्तावावर योग्य तो निर्णय घेण्यासाठी  सर्व पक्षिय समिती नेमण्यात यावी. एकतर्फी निर्णय घेण्यात येवू नये.त्यास आमचा विरोध राहिल.

**महापौर** स.सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे मुख्य अधिकारी तथा उपमुख्य अभियंता, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद यांना सुधारीत प्रस्ताव सादर करण्यासाठी कळविण्यात येइल

**ठराव क्र.१७३** **ठराव**

मुख्य अधिकारी तथा उपमुख्य अभियंता, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद यांचे पत्र क्र. ८२३६ दि. ३१.१२.१० च्या अनुषंगाने नांदेड शहराच्या वाढीव क्षेत्राच्या विकास योजनेमधील मौ. आसदवन मधील गट क्र. ४७, ४८, ५२, ५४, ५५, ५६, ५७, ५८, ५९, ६०, ६१, ६२, ६३, ६४, ६५, ६७, ६८, ६९, ७०, ७१, ७२, ७३, ७४,११३, ११४, ११५,११६, ११७, ११८, ११९, १२०, १२८, १२९, १३०, १३१ हे सोबतच्या नकाशात दर्शवलेले नूसार रहिवास भागात सामाविष्ट करण्यात येवून या क्षेत्रावर म्हाडाच्या अत्यल्प, मध्यम व उच्च उत्पन्न गटाच्या गृहनिर्माण योजना राबविण्याकरिता ५३.७५ हेक्टर जागा आरक्षित करण्याबाबत विनंती केलेली आहे.

तथापि, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने उपरोक्त गट क्र. पैकी मौ. आसदवन मधील गट क्र. ६१, ११३ चा काही भाग ११६, १२९, ११९, १२०, ११८, ५६ व ५७ मध्ये रहीवास वापराकरीता अभिन्यासास मंजूरी प्रदान केलेली आहे (१७.५३ हेक्टर जागा ) त्यामूळे अत्यल्प, मध्यम व उच्च उत्पन्न गटाच्या गृहनिर्माण योजना राबविण्याकरिता २६.२२ हेक्टर जागा शिल्लक राहते आणि मुख्य अधिकारी तथा उपमुख्य अभियंता, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद यांनी म्हाडाच्या अत्यल्प, मध्यम व उच्च उत्पन्न गटाच्या गृहनिर्माण योजना राबविण्याकरिता ५३.७५ हेक्टर जागा आरक्षित करण्याची मागणी केलेली आहे. त्यामध्ये खुप मोठी तफावत येत आहे. करीत हि बाब मुख्य अधिकारी तथा उपमुख्य अभियंता, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद यांना कळवून त्यांना सुधारीत प्रस्ताव सादर करण्यासाठी कळविण्यात यावे अशी ही नांवामनपा सर्वसाधारण  सभा सर्वानुमते संमत करते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.४**

कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा/ले.वि./सेनि/१२७२६/२०१३ दि.१८ सप्टेंबर २०१३ महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्र.निमवा-२०१३/प्र.क्र४२/सेवा-४ दि.जूलै  २०१३ नुसार निवृत्ती वेतन/कुटुंब निवृती वतनधारक यांचे  दि.१ जानेवारी  २०१३ ते ३० एप्रिल या कालावधीतील निवृत्ती वेतन/कुटुंब निवृती वेतनवरील  महागाई भत्ता  दरमहा ८० टक्के यादराने थकबाकी देण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आली त्यास  कार्योत्तर  मान्यता देणे बाबत.

**महापौर** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येते

**ठराव क्र.१७४** **ठराव**

कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा/ले.वि./सेनि/१२७२६/२०१३ दि.१८ सप्टेंबर २०१३ महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्र.निमवा-२०१३/प्र.क्र४२/सेवा-४ दि.जूलै  २०१३ नुसार निवृत्ती वेतन/कुटुंब निवृती वतनधारक यांचे  दि.१ जानेवारी  २०१३ ते ३० एप्रिल या कालावधीतील निवृत्ती वेतन/कुटुंब निवृती वेतनवरील  महागाई भत्ता  दरमहा ८० टक्के यादराने थकबाकी देण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आली त्यास  कार्योत्तर  मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.

**विषय क्र.५**

संदर्भ:-१) अर्जदार यांनी दाखल केलेला न्यायालयीन दावा क्र.४०७/९१
२) तत्कालिन नगरपालिका नांदेड यांनी दाखल केलेला न्यायालयीन दावा क्र.६/९३
३) श्री जिलानी खान पि.सादत खान यांचा विनंती अर्ज दि.२८.५.१३ व १.६.१३

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड हद्दीत जेएनएनयुआरएम अंतर्गत रस्ता क्र. ०९ देगलूर नाका ते माळटेकडी या रस्त्याचे रुंदीकरणामध्ये बाधीत होणारी मालमत्ता मनपा क्र. (नविन) ०९/०५/८८६ व जुना क्र. ०९/०५/३८ त ०९/०५/४८३ नामे म. जीलानी खान पी. सादत खान यांची मालमत्ता साईज १२ x २० तत्कालीन नगर पालिका नांदेड यांनी अधिगृहीत करणेसाठी त्योवेळी कार्यवाही सुरु केली असता संदर्भ क्र.१ अन्वये मालमत्ताधारकाने जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड येथे दावा क्र. ४०७/९१ दाखल केला असता संदर्भ क्र. ०१ अन्वये मालमत्ता धारकाने जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड यैथे दावा क्र.४०७/९१ दाखल केला असता न्यायालयाने सदर दाव्याचा दि.१७.१.९२ अन्वये डिक्री आदेश दिलेला आहे. सदर डिक्री आदेशाचे अनुषंगाने  तत्कालिन नगरपालिका नांदेड यांनी सदर मालमत्ता अधिग्रहित करणेसाठी  जिल्हा व सत्र न्यायायलय नांदेड येथे संदर्भ क्र.२ अन्वये दावा क्र.६/१३ दाखल केला असता न्यायालयीन आदेश दि.३०-७-९८ अन्वये तो फेटाळण्यात आलेला आहे.सध्या जेएनएनयूआरएम अंतर्गत रस्ते विकास कामात व्यत्यय होवू नये म्हणून संबंधिताशी चर्चा करुन त्याना महानगरपालिकेच्या प्रस्तावित बंजारा हॉस्टेल येथील मनपाच्या व्यापारी संकुलातील दुकान अथवा हैदरबाग पाण्याच्या टाकीजवळील एक (०१) दुकानाची मोकळी जागा देण्यात येईल असे आश्वासन देवून अतिक्रमण काढण्यात आले .सदंर्भ क्र.३ नुसार सदर मालमत्तारधारकाने व्यवसाय करण्याकरीता बंजारा हॉस्टेल येथील मनपाच्या मालमत्तेमधील १२x २० ची मोकळी जागा भाडेतत्वावर मिळणेसाठी विनंती केली आहे.

करीता देगलूर नाका ते माळटेकडी रोड रस्ता क्र. ०९ मध्ये बाधीत होणारी मालमत्ता चे मोबदल्यात बाधीत मालमत्ताधारक श्री म.जिलानी खान पि. सादतखान यांना बंजारा हॉस्टेल येथील मनपाच्या प्रस्तावित संकुलातील ०१ दुकान अथवा हैदरबाग पाण्याच्या टाकीजवळील मनपाची १ दुकान १२x २० आकाराची मोकळी जागा भाडेतत्वावर देण्याबाबत.

**महापौर** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१७५** **ठराव**

संदर्भः-१) अर्जदार यांनी दाखल केलेला न्यायालयीन दावा क्र.४०७/९१
२) तत्कालिन नगरपालिका नांदेड यांनी दाखल केलेला न्यायालयीन दावा क्र.६/९३
३) श्री जिलानी खान पि.सादत खान यांचा विनंती अर्ज दि.२८.५.१३ व १.६.१३

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड हद्दीत जेएनएनयुआरएम अंतर्गत रस्ता क्र. ०९ देगलूर नाका ते माळटेकडी या रस्त्याचे रुंदीकरणामध्ये बाधीत होणारी मालमत्ता मनपा क्र. (नविन) ०९/०५/८८६ व जुना क्र. ०९/०५/३८ त ०९/०५/४८३ नामे म. जीलानी खान पी. सादत खान यांची मालमत्ता साईज १२ x २० तत्कालीन नगर पालिका नांदेड यांनी अधिगृहीत करणेसाठी त्योवेळी कार्यवाही सुरु केली असता संदर्भ क्र.१ अन्वये मालमत्ताधारकाने जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड येथे दावा क्र. ४०७/९१ दाखल केला असता संदर्भ क्र. ०१ अन्वये मालमत्ता धारकाने जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड यैथे दावा क्र.४०७/९१ दाखल केला असता न्यायालयाने सदर दाव्याचा दि.१७.१.९२ अन्वये डिक्री आदेश दिलेला आहे. सदर डिक्री आदेशाचे अनुषंगाने तत्कालिन नगरपालिका नांदेड यांनी सदर मालमत्ता अधिग्रहित करणेसाठी जिल्हा व सत्र न्यायायलय नांदेड येथे संदर्भ क्र.२ अन्वये दावा क्र.६/१३ दाखल केला असता न्यायालयीन आदेश दि.३०-७-९८ अन्वये तो फेटाळण्यात आलेला आहे.सध्या जेएनएनयूआरएम अंतर्गत रस्ते विकास कामात व्यत्यय होवू नये म्हणून संबंधिताशी चर्चा करुन त्याना महानगरपालिकेच्या प्रस्तावित बंजारा हॉस्टेल येथील मनपाच्या व्यापारी संकुलातील दुकान अथवा हैदरबाग पाण्याच्या टाकीजवळील एक (०१) दुकानाची मोकळी जागा देण्यात येईल असे आश्वासन देवून अतिक्रमण काढण्यात आले .सदंर्भ क्र.३ नुसार सदर मालमत्तारधारकाने व्यवसाय करण्याकरीता बंजारा हॉस्टेल येथील मनपाच्या मालमत्तेमधील १२x २० ची मोकळी जागा भाडेतत्वावर मिळणेसाठी विनंती केली आहे.

करीता देगलूर नाका ते माळटेकडी रोड रस्ता क्र. ०९ मध्ये बाधीत होणारी मालमत्ता चे मोबदल्यात बाधीत मालमत्ताधारक श्री म.जिलानी खान पि. सादतखान यांना बंजारा हॉस्टेल येथील मनपाच्या प्रस्तावित संकुलातील ०१ दुकान अथवा हैदरबाग पाण्याच्या टाकीजवळील मनपाची १ दुकान १२x २० आकाराची मोकळी जागा भाडेतत्वावर देण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.६** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका दवाखाना आस्थापनेर मिश्रक (Pharmasist) या पदनामाची (०६) पदे रिक्त आहेत. मनपाचे दवाखाने जास्त असून प्रत्येक दवाखान्यामध्ये नियमान्वये व कायद्यान्वये मिश्रक (Pharmasist) पदाचे शैक्षणिक अर्हताधारण करणारे कर्मचारी असणे आवश्यक आहे. बऱ्याच दवाखान्यात मिश्रक (Pharmasist) या डिप्लोमा शिक्षणाचे कसलेही माहिती नसणारे कर्मचारी काम करीत आहेत. त्यामुळे मनपा दवाखान्यामध्ये येणाऱ्या रूग्णांस अशा कर्मचाऱ्यांमार्फत औषधाचे वितरण होऊन रुग्णांच्या जिवीतास धोका निर्माण होण्याची मोठया प्रमाणात शक्यता आहे. कामगार आयुक्त यांनी कार्यालयीन पत्र दि. ०८ मे २००९ अन्वये तत्कालीन मनपा आयुक्त यांना देऊन सुचित केले की, कंत्राटी तत्वावरील कार्यरत कर्मचाऱ्यास महानगरपालिका आस्थापनेवरील रिक्त असलेल्या पदावर जेष्ठतेनुसार व त्यांची शैक्षणिक अर्हतेनुसार सामावून घेण्यात यावे. मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) नुसार सर्वसाधारण सभा ही नियुक्ती प्राधिकरण आहे. कंत्राटी तत्वावरील कार्यरत कर्मचाऱ्यांस किंवा रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांस सेवेत सामावून घेण्याचे अधिकार सर्वसाधारण सभेस आहेत. श्री चंद्रकांत नारायण बनसोडे, क्षेत्र कार्यकर्ता हे गेल्या (१०) वर्षापासून मनपाच्या नगरी हिहताप योजना विभागातील कार्यरत कर्मचारी मिश्रक (Pharmasist) या पदाची शैक्षणिक अर्हताधारण करीत असून त्यांनी हैदरबाग, उमर कॉलनी, श्यामनगर येथील दवाखान्यामध्ये गुरु-ता-गद्दी सोहळा २००८ व स्वाईन फ्लुच्या साथीमध्ये अतिशय कुशलतेने काम केल्यामुळे त्यांस मनपाकडून प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले आहे. श्री चंद्रकांत नारायण बनसोड हे जातीने बौध्द असून त्यांचे वय (४१) वर्ष असल्यामुळे त्यांचे वय जास्त झाले असल्यामुळे त्यांस इतर कोणत्याही कार्यालयामध्ये नोकरी मिळू शकत नाही. ंचा घरात इतर कोणीही व्यक्ती कमवता नसून घरात आजारी आईवडीलांचे औषधोपचारासाठी व लहन मुलांचे शिक्षणासाठी पैसा कमी पडत आहे.

करिता श्री चंद्रकांत नारायण बनसोडे, क्षेत्र कार्यकर्ता यांस मनपाच्या दवाखाना आस्थापनेवर रिक्त असलेल्या मिश्रक (Pharmasist) या पदावर सामावून घेण्यासाठीचा हा प्रस्ताव येत्या सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर करण्यात यावा.

**सुचक** :- सुधाकर रामराव पांढरे **अनुमोदक** :- उमेश पवळे

**प्रशासकीय टिप्पणी**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत रोजंदारीवर श्री चंद्रकांत नारायणा बनसोडे, क्षेत्र कार्यकर्ता म्हणुन नागरी हिवताप योजने विभागात कार्यरत आहेत संबंधीतांना मनपा आस्थापनेवर रिक्त असलेल्या मिश्रक या पदावर सामावुन घेण्यासाठी श्री सुधाकर रामराव पांढरे स. सदस्यांनी मनपा सर्व साधारण सभेसमोर प्रस्ताव सादर केलेला आहे.

महानगरपालिकेत आस्थापनेवर अथवा रोजंदावरील/कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावर पदे भरावयाची असल्यास वर्तमानपत्रात जाहिरात देऊन आरक्षणानुसार पात्र व इच्छुक अमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येते त्यानंतर लेखी परिक्षा व तोंडी मुलाखत घेऊन निवड समिती समोर गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची निवड करण्यात येते. तसेच मजुर व मिश्रक या पदोन्ही पदाच्या प्रारूप सेवाप्रवेश नियमावलीत रोजंदावरील/कंत्राटी मजुर पदावरील कर्मचाऱ्यास मिश्रक पदावर समावुन घेणे बाबतची तरतुद नसल्यामुळे संबंधीतास मिश्रक पदावर समावुन घेता येणार नाही ही बाब मनपा सर्व साधारण सभेच्या निदर्शनास आणुन द्यावी.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** इतर महानगरपालिकेत कनिष्ट कर्मचारी ,रोजंदारी /कंत्राटी कर्मचारी चागले काम करीत असेल तर त्यांना महानगरपालिकेत सामावून घेण्यात येत असल्याची माहिती मिळालेली आहे त्यामूळे इतर महानगरपालिके प्रमाणे जे कनिष्ट कर्मचारी ,रोजंदारी/कंत्राटी कर्मचारी चांगले काम करीत असेल तर त्यांना रिक्त असलेल्या पदावर पदोन्नतीने /कायम सेवेत सामावून घेण्यात यावे.

**सुधाकर पांढरे** श्री चंद्रकांत नारायणा बनसोडे, क्षेत्र कार्यकर्ता म्हणुन नागरी हिवताप योजना विभागात १५ वर्षापासून उत्कृष्ट काम करीत असून त्यांचेकडे मिश्रक यापदासाठी लागणारी शैक्षणिक अर्हता डिफार्मसी पदवीका असल्यामूळे त्यांना शासन निर्णयानुसार मिश्रक यापदावर यारिक्त पदावर सामावुन घेण्यासाठी आयुक्तांनी संबंधिताची सचिका,शासन निर्णय,शैक्षणिक अर्हता तपासून पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी व हा ठराव याच सभ्‌ेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१७६** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका दवाखाना आस्थापनेर मिश्रक (Pharmasist) या पदनामाची (०६) पदे रिक्त आहेत. मनपाचे दवाखाने जास्त असून प्रत्येक दवाखान्यामध्ये नियमान्वये व कायद्यान्वये मिश्रक (Pharmasist) पदाचे शैक्षणिक अर्हताधारण करणारे कर्मचारी असणे आवश्यक आहे. बऱ्याच दवाखान्यात मिश्रक (Pharmasist) या डिप्लोमा शिक्षणाचे कसलेही माहिती नसणारे कर्मचारी काम करीत आहेत. त्यामुळे मनपा दवाखान्यामध्ये येणाऱ्या रूग्णांस अशा कर्मचाऱ्यांमार्फत औषधाचे वितरण होऊन रुग्णांच्या जिवीतास धोका निर्माण होण्याची मोठया प्रमाणात शक्यता आहे. कामगार आयुक्त यांनी कार्यालयीन पत्र दि. ०८ मे २००९ अन्वये तत्कालीन मनपा आयुक्त यांना देऊन सुचित केले की, कंत्राटी तत्वावरील कार्यरत कर्मचाऱ्यास महानगरपालिका आस्थापनेवरील रिक्त असलेल्या पदावर जेष्ठतेनुसार व त्यांची शैक्षणिक अर्हतेनुसार सामावून घेण्यात यावे. मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) नुसार सर्वसाधारण सभा ही नियुक्ती प्राधिकरण आहे. कंत्राटी तत्वावरील कार्यरत कर्मचाऱ्यांस किंवा रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांस सेवेत सामावून घेण्याचे अधिकार सर्वसाधारण सभेस आहेत. श्री चंद्रकांत नारायण बनसोडे, क्षेत्र कार्यकर्ता हे गेल्या (१०) वर्षापासून मनपाच्या नगरी हिहताप योजना विभागातील कार्यरत कर्मचारी मिश्रक (Pharmasist) या पदाची शैक्षणिक अर्हताधारण करीत असून त्यांनी हैदरबाग, उमर कॉलनी, श्यामनगर येथील दवाखान्यामध्ये गुरु-ता-गद्दी सोहळा २००८ व स्वाईन फ्लुच्या साथीमध्ये अतिशय कुशलतेने काम केल्यामुळे त्यांस मनपाकडून प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले आहे. श्री चंद्रकांत नारायण बनसोड हे जातीने बौध्द असून त्यांचे वय (४१) वर्ष असल्यामुळे त्यांचे वय जास्त झाले असल्यामुळे त्यांस इतर कोणत्याही कार्यालयामध्ये नोकरी मिळू शकत नाही. त्यांचे घरात इतर कोणीही व्यक्ती कमवता नसून घरात आजारी आईवडीलांचे औषधोपचारासाठी व लहन मुलांचे शिक्षणासाठी पैसा कमी पडत आहे.

करिता शासन निर्णयानुसार श्री चंद्रकांत नारायण बनसोडे, क्षेत्र कार्यकर्ता यांना मनपाच्या दवाखाना आस्थापनेवर रिक्त असलेल्या मिश्रक (Pharmasist) या पदावर सामावून घेण्याची मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते .तसेच नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील विविध विभागात कनिष्ट कर्मचारी कंत्राटी तत्वावरील कर्मचारी चांगले काम करीत असतील तर त्यांनाही रिक्त असलेल्या पदावर सामावुन घेण्यास मान्यता देण्यात येते व नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.७**

श्रीमती रुक्मीनबाई प्रकाश कंडेरा या महानगरपालिका सेवेतून सफाई कामगार या पदावरुन दिनांक ३१/१२/२००९ रोजी सेवानिवृत्त झाल्या आहेत. सेवा निवृत्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक १८/०१/२०१० व त्यांची मुलगी नामे पंचशिला हिस लाड कमिटीचे शिफारशी नुसार नोकरीवर घेण्यात यावे असा अर्ज दिला होता. मुलगी पंचशिला प्रकाश कंडेरा हीने सुध्दा दि. १८/०१/२०१० रोजी नोकरी देण्याची विनंती केली होती. संबंधितास कागदपत्रे सादर करणेस कार्यालयाने कळविले देखील होते. परंतु त्यांनी घरगुती अडचणीमुळे, व मुलीचे लग्न जमत असल्यामुळे कागदपत्रची पुर्तता केली. तशातच पंचशिला हिचे लग्न झाले असुन सध्या ती सासरी राहते. मुलीचे लग्न झाले असल्यामुळे रुक्मीनबाई प्रकाश कंडेरा यांचा मुलगा नामे रविकुमार प्रकाश कंडेरा यांनी लाडकमिटीचे शिफारशीनुसार नोकरीवर घेण्ययात यावे अशी विनंती दिनांक १०/०९/२०१२ व दि. १६/०१/२०१३ चे अर्जाद्वारे मा. आयुक्त यांचेकडे केली. त्यास रुक्मीनबाई प्रकाश कंडेरा (आई) यांनी दि. ३१/१०/२०१२ व पंचशिला प्रकाश कंडेरा (बहिण) दि. ३१/१०/२०१२ रोजी अर्जद्वारे लेखी संमती दिली आहे. अद्यापपावेतो श्री रविकुमार प्रकाश कंडेरा यांना नोकरीवर घेण्यात आले नाही. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे परिपत्रक क्र. संकिर्ण -२९२/१९९९/प्र.क्र.-१६/९२नवि-६ दि. ३०/०६/१९९४ मधील तरतुदीनुसार

सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचे वारसास वशिला पध्दतीने नेमणूक देण्याची तरतुद आहे. सदर परिपत्रकात असेही मनुद आहे की, सेवा निवृत्त कर्मचाऱ्यास वळचा नातेवाईक नसल्यास त्योच पालन-पोषण स्विकारऱ्यास नामनिर्देशाने नेमणूक देता येते. श्रीमती रूक्मीनबाई प्रकाश कंडेरा हयांनी सेवानिवृत्त झाल्यानंतर मुदतीत मुलीस नोकरीवर घेण्यात यावे असा अर्ज केला. मुलीचे लग्न झाल्यामुळे मुलास नोकरीवर घेणे संबंधीतचा अर्ज दिला. म्हणून प्रकरणात शासकिय मुदतीचे उल्लंघन झाले नाही. केवळ वारस बदलला आहे. वरील सर्व बाबींचा विचार सविस्तर करण्यात आला. श्री रविकुमार प्रकाश कंडेरा हयांना सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी व तयोच बहिणीने लेखी संमती दिली असल्यामुळे रविकुमार प्रकाश कंडेरा यांना लाड कमिटीचे शिफारशीनुसार त्यांचे आईचे ठिकाणी चतुर्थ श्रेणी पदावर नियुक्ती देण्याचा ठराव ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते. इतिवृत्तांत याच सभेत मान्यता देण्यात येते.

**सुचक** :- स.जानी **अनुमोदक** :- गफार खान गुलाम महमंद खान

**प्रशासकीय टिप्पणी**

श्रीमती रुक्मीनीबाई प्रकाश कंडेरा या स्त्रि सफाई कामगार यापदावरुन दि.३१.१२.२००९ रोजी सेवा निवृत्त झाल्या आहेत. त्यांनी दि.१८.१.२०१० रोजी अर्ज सादर करुन त्यांची मुलगी श्रीमती पंचशिला प्रकाश कंडेरा यांनी त्यांच्या आईच्या जागी लाड समितीच्या शिफारशीनूसार महानगरपालिकेत नौकरी देणे बाबत विनंती केली होती.

तसेच दि.१८.१.२०१० रोजी अर्ज सादर करुन श्रीमती पंचशिला प्रकाश कंडेरा यांनी त्यांच्या आईच्या सेवा निवृत्तीमूळे लाड समितीच्या शिफारशीनूसार महानगरपालिकेत नौकरी देणे बाबत विनंती केली होती.

संबंधितास विनंती अर्जानुसार आईचे जागेवर नेमणूक देणे बाबत शासन परिपत्रकातील तरतूदीनूसार कार्यालयीन पत्र क्र.नंवाशमनपा*/साप्रवि/अस्था-२/३६२१/१० दि.२.८.२०१०अन्वये आवश्यक ती कायदपत्र सादर करण्यास कळविण्यात आले होते

त्यानूसार कागदपत्र सादर केल्यानुसार संबंधितास कार्यालयीन पत्र क्र.नांवामशमनपा/साप्रवि/अस्था-२/४५९९/१० दि.१४.९.२०१० रोजी कागदपत्रसह मा.जिल्हाधिकारी तथा आयुंक्त मनपा नांदेड यांचे समक्ष उपस्थित श्रीमती रुक्मीनीबाई प्रकाश कंडेरा व श्रीमती पंचशिला प्रकाश कंडेरा राहण्यास कळविण्यात आले होते. त्यानूसार सबंधित हया उपस्थित राहिल्या असता मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांनी श्रीमती पंचशिला प्रकाश कंडेरा या विधवा असल्याने त्यांच्या मुलीच्या पतीचे मृत्यू प्रमाणपत्र व जात प्रमाणपत्र सादर करण्यास सांगितले त्यानुसार संबंधितास कार्यालयीन पत्र क्र.नांवामशमनपा/साप्रवि/अस्था-२/५०७०/१० दि.२४.९.२०१० अन्वये तसे सादर करण्यास कळविण्यात आले होते परंतु सबंधितांनी सदरचे पत्र प्राप्त होवूनही कागदपत्र आज पर्यत सादर केलेली नाही त्यामूळे संबंधितास लाड समितीचया शिफारशीनूसार नेमणूक देण्यात आली नाही.

श्रीमती पंचशिला प्रकाश कंडेरा यांनी आवश्यक तीमागणी केलेली कागदपत्रे सादर केल्यास त्यांना आईच्या जागेवर नोकरी देता आली असती परंतु त्यांनी कागदपत्र सादर केलेली नाही.श्री रविकुमार प्रकाश कंडेरा यांनी दि.१६.१.२०१३ अर्ज सादर करुन श्रीमती रुक्मीनीबाई कंडेरा यांचे सेवा निवृत्तीमूळे लाड कमिटीच्याशिफारशीनूसार महानगरपालिकेत नौकरी देण्याची विनंती केली आहे.

परंतु महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र .लासशि/२००६/६९/प्र.क्र.१०६/०६नवि/६ मंत्रालय मुंबई दि.१८ जानेवारी २००७ अन्वये कर्मचारी दिवंगत किंवा सेवा नियत अगर विकलांग झाल्याच्या दिनांकापासून १ वर्षाच्या मुदतीतसफाई कर्मचा-याच्या पात्र कुटूंबियांकडून नामनिर्देशित केलेल्या वारसदार व्यक्तीने समक्ष प्राधिका-याकडे त्या दिनांकापासून १ वर्षाच्या आत वारस हक्काने नियुक्ती मिळण्याकरीता अर्ज करणे आवश्यक आहे.असे नमूद आहे.

श्री रविकुमार प्रकाश कंडेरा यांनी वरील शासन निर्णयानूसार मुदतीच्याआंत अर्ज सादर केला नाही त्यामूळे श्रीमती रुक्मीनीबाई प्रकाश कंडेरा यांचे जागेवर संबंधितास नेमणूक देतायेत नाही असे कार्यालयीन पत्र क्र.नांवामशमनपा/साप्रवि/अस्था-२/११७६/२०१३ दि.२०.४.२०१३ अन्वये कळविण्यात आले आहे.

तदनंतर पुनश्च दि.२४.५.२०१३ रोजी श्री रविकुमार प्रकाश कंडेरा यानी अर्ज सादर करुन अर्जासोबत सोनपारखे रविकुमार किशनराव या नांवाचे शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र आपणास दत्तक घेतल्या बाबतचे नोटरीयल दत्तकपत्र त्यांचे व त्याचे आईचे नौकरी पत्र देणे बाबत शपथपत्रसादर केले त्या संदर्भात श्री रविकुमार प्रकाश कंडेरा यांना पुनश्च शासन निर्णयातील तरतूदीनूसार नैाकरी देता येत नाही असे कळविले आहे.

तथापी त्यानंतरही पुनश्च दि.२.७.२०१३ रोजी अर्ज सादर करुन त्यांच्या आईने व बहिणेने मुदतीत अर्ज सादर केल्यामूळे व बहिणेचे लग्न झाल्यामूळे ती सासरी राहते असे नमूद करुन बहिणी ऐवजी नौकरी द्यावी असे नमूद केले आहे.

वरील बाब विचारात घेता श्री रविकुमार प्रकाश कंडेरा यांनी सादर केलेल्या अर्जानुसार श्रीमती रुक्मीनीबाई प्रकाश कंडेरा या दि.३१.१२.२००९ रोजी सेवा निवृत्त झाल्या व दि.१६.१.२०१३ रोजी म्हणजे जवळपास ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी अर्ज सादर केला असल्यामूळे वरील शासन निर्णयातील तरतूदीनूसार मुदतीचेआत अर्ज सादर न केल्यामूळे श्री रविकुमार प्रकाश कंडेरा यांना लाड कमिटीच्या शिफारशीनूसार नौकरी देता येत नाही. असे कार्यालयीन पत्र क्र.नांवामशमनपा/साप्रवि/अस्था-२/१०६७७/२०१३ दि.२७.८.२०१३ अन्वये कळविण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधरण भाग ४ मे २१ ,२०११/वैशाख ३१,शके १९३३ अन्वये मु.प्रा.मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५३ मधील सुधारणेनूसार आयुक्त याना अधिकार आहेत.

करीता दि.१८.१.२००७ च्या शासन निर्णयातील तरतूदीनूसार श्री रविकुमार प्रकाश कंडेरा यांचा श्रीमती रुक्मीनीबाई प्रकाश कंडेरा यांच्या सेवा निवृत्तीनंतर नौकरी बाबतचा अर्ज एक वर्षाच्याआत प्राप्त झालेला नाही त्यामूळे दि.१८.१.२००७ च्या परिपत्रकातील तरतूदीनूसार एक वर्षाच्या आंत अर्ज् सादर न केल्यामूळे लाड समितीच्या शिफारशीनूसार नौकरी देण्याबाबतच्या अर्जावर विचार करता येत नाही .

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१७७** **ठराव**

श्रीमती रुक्मीनबाई प्रकाश कंडेरा या महानगरपालिका सेवेतून सफाई कामगार या पदावरुन दिनांक ३१/१२/२००९ रोजी सेवानिवृत्त झाल्या आहेत. सेवा निवृत्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक १८/०१/२०१० व त्यांची मुलगी नामे पंचशिला हिस लाड कमिटीचे शिफारशी नुसार नोकरीवर घेण्यात यावे असा अर्ज दिला होता. मुलगी पंचशिला प्रकाश कंडेरा हीने सुध्दा दि. १८/०१/२०१० रोजी नोकरी देण्याची विनंती केली होती. संबंधितास कागदपत्रे सादर करणेस कार्यालयाने कळविले देखील होते. परंतु त्यांनी घरगुती अडचणीमुळे, व मुलीचे लग्न जमत असल्यामुळे कागदपत्राची पुर्तता केली. तशातच पंचशिला हिचे लग्न झाले असुन सध्या ती सासरी राहते. मुलीचे लग्न झाले असल्यामुळे रुक्मीनबाई प्रकाश कंडेरा यांचा मुलगा नामे रविकुमार प्रकाश कंडेरा यांनी लाडकमिटीचे शिफारशीनुसार नोकरीवर घेण्ययात यावे अशी विनंती दिनांक १०/०९/२०१२ व दि. १६/०१/२०१३ चे अर्जाद्वारे मा. आयुक्त यांचेकडे केली. त्यास रुक्मीनबाई प्रकाश कंडेरा (आई) यांनी दि. ३१/१०/२०१२ व पंचशिला प्रकाश कंडेरा (बहिण) दि. ३१/१०/२०१२ रोजी अर्जद्वारे लेखी संमती दिली आहे. अद्यापपावेतो श्री रविकुमार प्रकाश कंडेरा यांना नोकरीवर घेण्यात आले नाही. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे परिपत्रक क्र. संकिर्ण -२९२/१९९९/प्र.क्र.-१६/९२नवि-६ दि. ३०/०६/१९९४ मधील तरतुदीनुसार सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचे वारसास वशिला पध्दतीने नेमणूक देण्याची तरतुद आहे. सदर परिपत्रकात असेही मनुद आहे की, सेवा निवृत्त कर्मचाऱ्यास वळचा नातेवाईक नसल्यास त्योच पालन-पोषण स्विकारऱ्यास नामनिर्देशाने नेमणूक देता येते. श्रीमती रूक्मीनबाई प्रकाश कंडेरा हयांनी सेवानिवृत्त झाल्यानंतर मुदतीत मुलीस नोकरीवर घेण्यात यावे असा अर्ज केला. मुलीचे लग्न झाल्यामुळे मुलास नोकरीवर घेणे संबंधीतचा अर्ज दिला. म्हणून प्रकरणात शासकिय मुदतीचे उल्लंघन झाले नाही. केवळ वारस बदलला आहे. वरील सर्व बाबींचा विचार सविस्तर करण्यात आला. श्री रविकुमार प्रकाश कंडेरा हयांना सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी व तयोच बहिणीने लेखी संमती दिली असल्यामुळे रविकुमार प्रकाश कंडेरा यांना लाड कमिटीचे शिफारशीनुसार त्यांचे आईचे ठिकाणी चतुर्थ श्रेणी पदावर नियुक्ती देण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.८**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील अभिन्यासातील स.न.३१/१/बी जानकी नगर येथील मोकळी जागा खाजगी करण्या मार्फत खाजगी व्यक्तीस विकसीत करण्यासाठी देण्यात आलेली असून सदरील जागा विकसीत करण्यासाठी आयुक्तांनी कोणकोणत्या अटी व शर्ती निश्चित केल्या होत्या व संबंधितांनी सदरील अटीव शर्तीनुसार जागेचा विकास केला आहे किंवा कसे याची सविस्तर माहिती सभागृहास देण्यात यावी.

**सुचक** :- सौ. सविता मारोतराव कंठेवाड **अनुमोदक** :- प्रविण बालाप्रसाद बियाणी

**<u>प्रशासकीय टिप्पणी</u>**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड हद्दितील सर्वे नं.३२/१ मौ. असदुल्लाबाद येथील जानकीनगर अभिन्यासातील खुली जागेवर उद्यान विकसीत करण्यासाठी श्री देशमुख बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स यांना खाली अटीवर देण्यात आलेली आहे.

१. विकसीत केलेले उद्यान हे सार्वजनिक वापरासाठी खुले राहील.
२. या जागेत कसल्याच प्रकारचे बांधकाम महानगरपालिका परवानगी शिवाय करता येवु नये.
३. उद्यान विकासाचे सर्व कामे स्वखर्चाने करावेत तसेच ही काम महानगरपालिकेच्या उद्यान अधिक्षक यांचे मार्गदर्शना खाली करावे लागेल.
४. उद्यानाची नियमीत देखील दुरुस्ती आपण स्वखर्चाने करावी
५. सदरील जागा व उद्यानाची पुर्ण मालकी महानगरपालिकेची राहील.
६. सदरील जागेवर महानगरपालिका नांदेड मालकीचा फलक व क्षेत्रफळ व पत्ता लिहावा.
७. वरील मुदतीचा सुधारीत करारनामा करून द्यावा लागेल.
८. वरील अटीचे उल्लंघन केल्यास सदरील जागा ताब्यात घेण्याचे अधिकार आयुक्त नांदेड वा.श.मनपा नांदेड यांना राहील.
९. या जागेत भिंत किंवा इतर स्थायी काम करता येणार नाही.
१०. सदरील जागेवर अतिक्रमण होणार नाही याची जबाबदारी आपल्यावर राहील.
११. सदरील जागेवर प्रवेशासाठी नागरीकांकडुन कोणतीही कर अथवा फि आकारता येणार नाही.
१२. सदरील जागेवर जाहीरात फलक/बोर्ड लावता येणार नाही.

१३. सदर जागेवर धार्मिक वस्तु व मुर्ती इत्यादी बसविता येणार नाही.

वर नमुद जागा सालसन २००४ पासून ११ महिण्याकरीता व नंतर मुदतवाढ असे सालसन २००८ पर्यंत मुदत वाढवुन देण्यात आलेली आहे. व नुकतीच सदर जागेची स्थळ पहणी मालमत्ता अधिकारी यांनी केली असता जागेवर उद्यान विकसीत केले आहे. परंतु संबधीतांनी अट क्र. १३ चा भंग करून मंदिराचे बांधकाम केल्याचे दिसुन आले आहे. ज्यामुळे संबंधीतास मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ८१ (ब) ची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**सविता कंठेवाड** नांदेड वाघाळा शहर मनपा नांदेड हद्दितील सर्वे नंबर ३२/१ मौ. अस्दुलाबाद येथील जानकी नगर येथील खुली जागेवर उद्यान विकसित करण्यासाठी श्री. देशमुख बिल्डर्स अँड डेव्हलोपर्स यांना देण्यात आली होती. परंतू त्यांनी महानगरपालिकेच्या एकही अट पाळल्या नाही. त्या अटी खालील प्रमाणे आहेत.

१. विकसित केलेले उद्यान हे सार्वजनिक वापरासाठी खुले राहील परंतु त्यांनी वैयक्तिक सोसायटीसाठी वापर करीत आहे.
२. या जागेत कसल्याही प्रकारच्चया बंधकाम मनपा परवानगी शिवाय करता येऊ नये. या ठिकाणी ज्याप्रकारचे बांधकाम केलेले आहे. त्याची परवानगी घेतली नाही.
३. मनपा उद्यान अधिक्षक यांचे मार्गदर्शन घेतले नाही.
४. सदरील जागेवर मनपा नांदेडचे एकही फलक,क्षेत्रफळ व पत्ता लिहिला नाही.
५. या जागेचा करारनामा हा सन २००७ ला केला होता. परंतु त्यानंतर सुधारित करारनामा केला नाही. आज सन २०१३ चालू आहे म्हणजे पाच वर्षे कालवधी लोटला आहे.
६. सदरील जागेवर वरील सर्व अटींचे उल्लंघन केले आहे त्यामुळे सदरील जागा ताब्यात घेण्याचा अधिकार मनपा आयुक्त नांदेड यांच्याकडे स्वाधीन करून सर्व नागरिकांना वापरण्यासाठी उद्यान खुले असावे.
७. या जागेत भिंत व स्थायी बांधकाम केले आहे.
८. सदरील जागेवर वैयक्तिक नावाचा फलक लावला आहे.
९. सदरील जागेवर धार्मिक वस्तू व मुर्ती इत्यादी बसविण्याची तयारी करण्यात आली आहे.

या सर्व बाबी मी मालमत्ता विभागास निदर्शनास आणुन दिल्यावरही मालमत्ता विभागाने अद्याप दुर्लक्ष केले व संबंधीत व्यक्तीस नोटीस का देण्यात येत नाही. संबंधीत व्यक्तीने नागरिकांची व मनपाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला.आम्हा लोकप्रतिनीना त्या भागातील नागरीक या खुल्या जागेच्या संदर्भात विचारणा करीत आहे.

**गफारखान** ११ महिण्याच्या करारावर जागेचा विकास करण्यासाठी परवानगी देण्यात आलेली आहे.

**आयुक्त** मालमत्ता व्यवस्थापक याना सदरील जागेवर वैयक्तिक नावाचा फलक लावला असेल तर तो काढून टाकण्याविषयी आणि ज्या अटी व शर्तीनुसार खुली जागा विकसित करण्यासाठी देण्यात आलेली आहे त्यानुसार जागेचा विकास करण्यात आलेला आहे किंवा नाही याची स्थळ पाहणी करुन चौकशी अहवाल सादर करण्यास आदेशित करण्यात आलेले आहे.चौकशी अहवाल आल्यानंतर तो सर्वसाधारणसभे समोर सादर करण्यात येईल.त्यावर सभागृहाने योग्य तो निर्णय घ्यावा सदरील जागेवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्यास परवानगी देण्यात आलेली नाही परंतु अनाधिकृतरित्या मंदिराचे बांधकाम केल्याचे दिसून आलेले आहे .

**महापौर** प्रस्तावांच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या माहितीची नोंद घेण्यात येते

**ठराव क्र.१७८** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील अभिन्यासातील स.न.३१/१/बी जानकी नगर येथील मोकळी जागा खाजगी करण्या मार्फत खाजगी व्यक्तीस विकसीत करण्यासाठी देण्यात आलेली असून सदरील जागा विकसीत करण्यासाठी ज्या अटी व शर्ती निश्चित केल्या होत्या त्याची माहिती सभागृहात देण्यात आली त्यांची नोंद हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.

**विषय क्र.९**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड प्राथमिक शाळा क्र. १४ इस्लामपुरा नांदेड येथे १ ते ४ पर्यंत वर्ग चालू आहे. या पुढे नैसर्गिक वाढ म्हणून वर्ग ५ वा उघडण्यात यावे जेणे करून इस्लामपुरा भागात राहणारे गोरगरीब मुलांना शाळा करिता लांब जाऊ नये किंवा शिक्षणापासून वंचित राहू नये. इस्लामपुरा हे वस्ती स्लम आहे व या भागात उच्च प्राथमिक शाळा दोन ते ती कि.मी. लांब असल्यामुळे बरेच विद्यार्थी मधून शाळा सोडून देत आहे. ज्यामुळै ड्रॉप आऊट चे प्रमाण वाढत आहे म्हणून या भागात उच्च प्राथमिक शाळा सुरु करणे अत्यंत गरजेचे आहे.

त्याकरिता इस्लामपुरा येथे सुरु असलेल्या (१ ली ते ४ थी) प्राथमिक शाळेत वर्ग ५वा ची नैसर्गिक वाढ आधारे १ वर्ग त्वरीत सुरु करण्यास ही सर्व साधारण सभा सर्वानुमते मंजुरी देते व ठरावालाच सभेत कायम करण्यात येते.

**सुचक** :- बीपाशा बेगम वलीयोध्दीन **अनुमोदक** :- अ.हबीब अ.रहिम,स.शेर अली महेबूब अली.आसीया बेगम अ.हबीब

**महापौर** स.सदस्यांच्या प्रस्तावानूसार नैसर्गिक वाढीच्या आधारे वर्ग पाचवा व नैसर्गिक वाढीच्या त्यापुढील वर्ग सुरु करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**ठराव क्र.१७९** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड प्राथमिक शाळा क्र. १४ इस्लामपुरा नांदेड येथे पहिली ते चौथी पर्यंत वर्ग चालू असून ईयत्ता चौथी नंतर या शाळेतील मुलांना दोन ते ती कि.मी. दुरच्या दुस-या उच्च माध्यमिक शाळा शाळेत प्रवेश घ्यावा लागतो. इस्लामपुरा हा भाग पुर्ण झोपडपटीचा भाग असून येथे राहणारे नागरीक पुर्ण मोलमजुरी करुन आपली उपजिविका करतात त्यामूळे आपल्या मुलांना दुरच्या उच्च माध्यमिक शाळेत जाण्यासाठी रिक्षाचे भाडे भरु शकत नसल्यामूळे मुले पुढील शिक्षण सोडून देत आहेत व ते शिक्षणापासून वंचित राहत आहे व ड्रॉप आऊट चे प्रमाण वाढत आहे करीता इस्लामपुरा प्राथमिक शाळेत पहिली ते चौथीच्या वर्गानंतर नैसर्गिक वाढीच्या आधारे वर्ग पाचवाचा एक वर्ग त्वरीत सुरु करण्यास तसेच नैसर्गीक वाढीच्या आधारे दरवर्षी त्या पुढील वर्ग सुरु करण्यास ही नांवामनपा सर्व साधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.१०** **प्रस्ताव**

सिडको स्मशानभुमीत नां.वा.श.म.न.पा. हद्दीतील सिडको/हडको भाग आहे सिडको मधील स्मशानभुमी अंदाजे ३० वर्षाचा काळ झाला असून ती सर्वधर्मीय आहे, आज येथील वाढलेली लोकसंख्या व स्मशानभुमीला त्याप्रमाणे लागणारी जागा याचा विचार करता अस्तित्वातील स्मशानभुमीची जागा हि अपुरी पडत आहे. सिडकोने स्मशानभुमी करिता राखीव ठेवलेल्या जागेपैकी काही भा्र रिकामा ठेवण्यात आला आहे. तरी त्यासाठी वाढीव स्मशानभुमी करण्याकरिता त्या ओपन ठेवलेल्या जागेचा समावेश करण्यात यावा. व स्मशानभुमी विकसित करण्यात यावी.

**सुचक :-** संदीप सुभाषराव चिखलीकर **अनुमोदक** :- सौ. शिला सुनिल कदम

**<u>मालमत्ता विभागाची प्रशासकीय टिप्पणी</u>**

सिडको येथील स्मशानभुमी लगत सिडको अभिन्यासामध्ये ओपन स्पेस व सर्व्हिस इंडस्ट्रीज म्हणुन दर्शविलेली आहे. सदरील जागा सिडकोने महानगरपालिका ताब्यात दिली आहे. शासन परिपत्रक व विकास नियंत्रक नियमावलीत खुल्या जागेच्या क्षेत्रापैकी १० % क्षेत्रावर, बालक मंदिर, क्लब हॉल, वगैरे सारखे तळमजल्याचे बांधकाम अनुज्ञेय आहे. खुल्या जागेचा उर्वरीत भाग हा कायमस्वरूपी खुला ठेवण्यात यावा व सर्व भुखंड धारकांसाठी, खेळांचे मैदान उद्यान अथवा करमणुकीचे मैदान म्हणुन उपलब्ध करून देण्यात यावा असा आहे. करीता ओपन स्पेस वाढीव स्मशान भुमीसाठी करता येणार नाही.

**<u>नगररचना विभागाची प्रशासकीय टिप्पणी</u>**

सिडको भाग हा मनपा वाढीव क्षेत्रातील असून सदर भागाची विकास योजना अद्याप तयार झालेली नाही. सिडको कार्यालयाने सदर भाग विकसित केला असून सिडको कार्यालयाचे लेआऊट प्लान नुसार स्मशानभुमीच्या बाजूस सर्व्हिस इंडस्ट्रीज व ओपन स्पेस करीता जागा राखीव ठेवलेली आहे. सदर राखीव जागेचा वापर स्मशान भुमीकरीता करावयाचा असल्यास सिडको कार्यालयाचा अभिप्राय घेवून स्मशान भुमी विकसित करणे योग्य राहील.

**<u>बांधकाम विभागाची प्रशासकीय टिप्पणी</u>**

सिडको प्रशासनातर्फे अंदाजे ३० वर्षापुर्वी सर्वधर्मीय करिता स्मशानभुमि करिता ६९५२ चौ.मी. जागा राखीव ठेवण्यात आली व त्याचा वापर त्या त्या धर्मीय बंधुनी करणे चालु आहे. त्यात मुस्लिम, लिंगायत दफनभुमि व २ आर.सि.सि. दहन शेड उभारण्यात आलेले आहेत. परंतु नगररचना विभागच्या अहवालानुसार सदर भागातील स्मशानभुमी सिडको कार्यालयाने मंजुर केलेल्या अभिन्यासातील आहे. सिडको कार्यालयाचे अभिन्यास नकाशानुसार सदर स्मशानभुमि लगत सर्व्हिस इंडस्ट्रीज व ओपन स्पेस करिता जागा राखीव आहे. सदर जागेचा उपयोग स्मशानभुमि करिता करावयाचा असल्यास सिडको कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र घेवुन तद्नंतर ओपन ठेवलेल्या जागेचा समावेश करून स्मशानभुमि विकसित करण्याची कार्यवाही करणे योग्य राहील.

**महापौर** नगररचना विभागाच्या प्रशासकीय टिप्पणीनूसार प्रस्तावास मान्यता देण्यात येते. व हा ठराव याच सभेत कायम करण्या येतो.

**ठराव क्र.१८०** **ठराव**

सिडको स्मशानभुमीत नां.वा.श.म.न.पा. हद्दीतील सिडको/हडको भाग आहे सिडको मधील स्मशानभुमी अंदाजे ३० वर्षाचा काळ झाला असून ती सर्वधर्मीय आहे, आज येथील वाढलेली लोकसंख्या व स्मशानभुमीला त्याप्रमाणे लागणारी जागा याचा विचार करता अस्तित्वातील स्मशानभुमीची जागा हि अपुरी पडत आहे. सिडको कार्यालयाने अभिन्यास नकाशानुसार सदर स्मशानभुमि लगत सर्व्हिस इंडस्ट्रीज व ओपन स्पेस करिता जागा राखीव ठेवलेली असल्यामूळे सिडको अभिन्यासातील सर्व्हिस इंडस्ट्रीज व ओपन स्पेस जागेचा वापर विस्तारीत स्मशानभुमि करिता करण्याकरीता सिडको कार्यालयास ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते शिफारस करते. सिडको कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर सदर स्मशानभुमिचा विस्तार करुन जागेचा विकसित करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विशेष बाब म्हणून आयत्या वेळेस घेण्यात आलेले प्रशासनाचे प्रस्ताव**

**शहर .अभियंता** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील १) कौठा गांव ते रस्ता क्र.३८ अ २) रस्ता क्र.१० ते ३८ अ ३) रस्ता क्र.८ ते कालापूल या तीन रस्त्यांचा विकास करण्याकरीता रु.२१.७० कोटीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला असून त्या सविस्तर प्रकल्प अहवालात केंद्र शासनाच्या जेएनएनएनयूआरएम योजने अंतर्गत मान्यता मिळण्यासाठी मान्यता देण्यात यावी तसेच या प्रकल्पाकरीता महानगरपालिकेचा अनुज्ञेय वाटा देण्याकरीता प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात यावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात यावा. अशी विनंती आहे

**महापौर** शहर अभियंता यांनी मांडलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१८१** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील १) कौठा गांव ते रस्ता क्र.३८-अ २) रस्ता क्र.१० ते ३८-अ ३) रस्ता क्र.८ ते कालापूल या तीन रस्त्यांचा विकास करण्याकरीता रु.२१.७० कोटीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला असून त्यास प्रशासकीय व आर्थिक मान्यता तसेच सदरील सविस्तर प्रकल्प अहवालात केंद्र शासनाच्या जेएनएनएनयूआरएम योजने अंतर्गत मान्यता देण्यासाठी केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यास ही नांदेड वाघाळा शहर महानगनपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते तसेच या प्रकल्पाकरीता महानगरपालिकेचा अनुज्ञेय वाटा भरण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांदेड वाघाळा शहर महानगनपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**महापौर** आजच्या सभेचे कामकाज संपल्यामूळे सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते .शेवटी राष्ट्रगित म्हणण्यात येइल.

शेवटी राष्ट्रगित म्हणण्यात आले.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका.नांदेड

**स्वाक्षरीत/-**
**महापौर,**
नांदेड वाघाळा शहरमहानगरपालिका, नांदेड.